# संगीतकार श्रीनिवास खळे यांच्या कारकीर्दीतील गायक–गायिका : एक दृष्टीक्षेप

**सौ. श्रुती मंदार कुलकर्णी**,संशोधक विद्यार्थीनी,
संगीत व नाटयशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**सारांश:**

महाराष्ट्रासारख्या बुध्दिवंतांच्या प्रदेशात शब्द आणि स्वरांचा संगम नवनवोन्मेषी प्रतिभेला साद घालणारा ठरला. गेल्या ७० वर्षांच्या काळात भावसंगीताची एक प्रभावी, प्रवाही आणि कलात्मक परंपरा निर्माण झाली. मात्र गीताचे शब्द, भावतरलता, हळूवारपणा यांचे योग्य भान ठेवून ज्या रचना बांधल्या गेल्या, असे संगीत महाराष्ट्राच्या मनात गेली कित्येक वर्षे जपले गेले आहे. अशा गीतांना शाश्वताचा स्पर्श देणाऱ्या संगीतकारांमध्ये 'पद्मभूषण श्रीनिवास खळे' यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.

श्रीनिवास खळे यांनी त्यांच्या रचनांमध्ये शास्त्रीय संगीतातील अभिजातता जपली आणि जतन केली. **'अभिजात संगीत'** म्हणजे सुराधिष्ठित संगीत. भारतामध्ये राग संगीतालाच अभिजात संगीत असे संबोधले जाते. अभिजात शास्त्रीय संगीतात राग गायन आणि त्याचा विस्तार–बंदिश, आलाप, बोलआलाप, बोलताना, ताना अशा क्रमाने होत असतो. कणस्वर, मिंड, खटका, मूर्की, मूर्च्छना, गमक, आंदोलन इ. अलंकारांनी ही गायकी सजलेली असते. श्रीनिवास खळे यांच्या रचनांमधून, भावसंगीत सादर करण्याच्या कालमर्यादेत, अभिजात संगीताची सर्व लक्षणे विपुल प्रमाणात दिसून येतात. म्हणून त्यांच्या स्वररचनाही अभिजाततेचा दर्जा प्राप्त करतात आणि महाराष्ट्राचा 'सांस्कृतिक वारसा' अशी आपली खूण स्पष्ट करतात.

मराठी–हिंदीमधील बहुतेक सर्व प्रस्थापित, नामवंत तसेच नवोदित अशा ९२ गायक–गायिकांनी श्रीनिवास खळे यांच्या रचना गायल्या आहेत. 'अरुण दाते', 'कुंदा बोकील', 'जयवंत कुलकर्णी' हे सुगम संगीताच्या क्षितीजावरील तारे सर्वस्वी श्री. खळे यांच्या रचना गाऊन उदयाला आले आहेत.

प्रत्येक गायकाच्या आवाजातील गुण, दोष ओळखून आणि सूक्ष्मपणे अभ्यासून खळे यांनी त्या–त्या गायकाला साजेशा, स्वतंत्र रचना बांधल्या. स्वत: उत्तम शास्त्रीय गायक असल्यामुळे रचनेसाठी पोषक हरकती, मींड, मुरक्या इत्यादी ते गायकाला स्वत: गाऊन दाखवीत आणि तितक्याच परिणामकारकपणे गायकाला शिकवून त्यांच्याकडून गाऊनही घेत.

संगीतकार म्हणून त्यांनी मराठी माणसाला भरभरुन दिलेले हे संगीताचे दान अतीव आनंददायी व भावमधूर आहे.

**प्रस्तावना:**

काव्य, संगीत, नृत्य, शिल्प–चित्र या कलांनी माणसाचे जीवन विविधांगांनी समृध्द केले आहे. या शतकात दृक–श्राव्य माध्यमांच्या सर्वव्यापी प्रसारामुळे या कला घरोघरी पोहोचल्या आणि त्यांनी माणसाच्या अभिरुचीचा दर्जा उंचावला असे संशोधक म्हणून मला जाणवते.

'संगीत' ही मानवाची एक नैसर्गिक प्रवृत्ती आहे. नैसर्गिकरीत्या लोकमानसातून स्त्रवलेलं संगीत जेव्हा जाणीवपूर्वक सौंदर्याकार घेण्याच्या प्रक्रियेतून गेलं तेव्हा संगीत एक 'कला' म्हणून सिध्द झाले. ६४ कलांमधील सर्वश्रेष्ठ कला म्हणून संबोधले जाणारे संगीत हे एक ज्ञानाधिष्ठित असे अस्तित्व आहे. संगीत हे एक शास्त्र असल्यामुळे, संगीत ही विद्याही आहे आणि ती कलाही आहे.

लहानपणापासून शास्त्रीय संगीत शिकत असताना सुध्दा सुगम संगीताबद्दल मला प्रचंड कुतुहल आणि तितकाच जिव्हाळा वाटत आलेला आहे. शास्त्रीय संगीताच्या तुलनेत सुगम संगीत गायला सोपे असा गैरसमज जनमानसात आहे. रागदारी संगीतात कलाकार रागाचे नियम पाळून एखादा राग मांडतो. परंतू सुगम संगीताला राग नियमांचे बंधन नाही.

त्यामुळेच त्याच्या अभ्यासाची व्याप्ती इतकी अमर्याद वाढते की, अशा संगीत प्रकाराला 'सुगम' ऐवजी 'दूर्गम' संगीत म्हणावे असे अभ्यासांती प्रामाणिकपणे मला जाणवले.

सुगम संगीताची मनापासून आवड आणि त्यातून निर्माण झालेली सर्वोत्तम संगीत ऐकण्याची असोशीयामधून श्रेष्ठ संगीतकार 'श्रीनिवास खळे' यांच्या रचनांच्या सान्निध्यात मी आले. शब्द आणि स्वर यांचे अद्वैत म्हणजे श्रीनिवास खळे यांच्या रचना! त्यांच्या रचनेमध्ये वैचित्र्य आहे, भावपूर्णता आहे. गीतांच्या चाली ऐकायला अतिशय गोड वाटल्या तरी गाताना चालींच्या कठीणपणाची कल्पना आल्याशिवाय रहात नाही. तालाच्या दृष्टीने ही त्यांची गीते क्लिष्ट आहेत याचे कारण त्यांच्या संगीत प्रतिभेला शास्त्रीय ज्ञानाची पक्की बैठक आहे. त्यांनी आपल्या रचनांमध्ये शास्त्रीय संगीतातील अभिजातता जपली आणि जतनही केली. म्हणून पद्मभूषण श्रीनिवास खळे– 'सुगम संगीतातील अभिजातता' — एक चिकित्सक अभ्यास हा विषय मी माझ्या पी. एचडी संशोधनासाठी निवडला.

श्रीनिवास खळे यांच्या सांगीतिक कारकिर्दीत त्यांनी ११० गीतकार तर ९२ गायक–गायकांकडून आपल्या रचना गाऊन घेतल्या. समोर आलेल्या कलावंतांचा आवाका, त्यांच्या आवाजाचा गुणधर्म, त्यातील दोष, यांचा सूक्ष्म अभ्यास करुनच त्या कलाकाराकडून जास्तीत जास्त परिणामकारक गीत गाऊन घेणे हा स्वतःचा धर्म मानून त्यांनी अत्यंत मेहेनतीने आणि आनंदाने या रचना बांधल्या.

**विषय विवेचनः**

श्रीनिवास खळे यांनी अनेक गायक–गायिकांकडून आपली गाणी गाऊन घेतली. लता मंगेशकर, आशा भोसले अशा प्रस्थापित आघाडीच्या गायिकांबरोबरच सुमन कल्याणपूर, कुंदा बोकिल, देवकी पंडीत, सुधा मल्होत्रा, कृष्णा कल्ले, मालती पांडे, बकुल पंडीत, पुष्पा पागधरे, कविता कृष्णमूर्ती इ. प्रतिभावान गायिकांनी गाईलेली गाणीसुध्दा लोकप्रिय झाली यात संगीतकार म्हणून खळे यांच्या संगीताचा प्रामुख्याने वाटा होता.

त्याचप्रमाणे पं. भिमसेन जोशी, पं. वसंतराव देशपांडे, सुधीर फडके, पं. **हृ**दयनाथ मंगेशकर, सुरेश वाडकर, अरुण दाते, मन्ना डे अशा एकापेक्षा एक मातब्बर गायकांकडून त्यांनी गाणी गाऊन घेतली. तीही तितकीच लोकप्रिय झाली.

**श्रीनिवास खळे यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली गाईलेल्या काही प्रमुख गायिका —**

**१) लता मंगेशकर**

श्रीनिवास खळे आणि लता मंगेशकर यांचा परिचय अनेक वर्षांपासूनचा होता तरी लता मंगेशकर यांना, खळेंच्या संगीत दिग्दर्शनाखाली गाण्याचा योग आला तो १९६८ मध्ये 'जिव्हाळा' चित्रपटाच्या वेळी! या चित्रपटातील 'या चिमण्यांनो परत फिरा रे' या गीतातून गीतकार ग. दि. माडगुळकर यांनी संध्याकाळच्या कातर वेळेचे औदासिन्य टिपले आहे. आपल्या मुलांच्या प्रतिक्षेत असणाऱ्या आईच्या मनाला लागलेली हूरहूर आणि त्या हूरहूरीतून उमटलेली तिची व्याकूळ साद असा गीताचा आशय खळेंच्या चालीतून समर्थपणे व्यक्त होतो. लता मंगेशकरांच्या दैवी आवाजामुळे या गीतातील मींड, मुरकी, मूर्च्छना हे अभिजात संगीतातील सर्व प्रकार उत्तमरित्या प्रकट झाले आहे. श्री. खळेंच्या रचनांमधील केवळ स्वरांचाच नाही तर त्याबरोबर शब्द, भावना, उच्चार यांचाही अभ्यास लता मंगेशकरांनी अत्यंत डोळसपणे केलेला त्यांच्या गीतांमधून दिसतो.

या गीता पाठोपाठ १९६८ मध्येचं पाडगावकरांचे 'श्रावणात घननीळा बरसला' हे गीत श्री खळे यांनी लता मंगेशकरांकडून ध्वनीमुद्रित करुन घेतले. पुढे १९७३ मध्ये, संत तुकारामांच्या निवडक ८ अभंगांची दीर्घ ध्वनीमुद्रिका'अभंग तुकयाचे' ही लता मंगेशकरांच्या आवाजात ध्वनीमुद्रित केली. १९८५ मध्ये श्री. खळे यांच्या रचनांमध्ये 'मैलाचा दगड' ठरलेल्या 'राम शाम गुणगान' ही पं. नरेंद्र शर्मा यांनी लिहिलेल्या भक्तीगीतांची ध्वनीमुद्रिकात्यांनी प्रसिध्द केली. यामध्ये गानसम्राज्ञी भारतरत्न लता मंगेशकरांबरोबरच स्वरभास्कर भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांना श्री. खळे यांनी एकत्रित आणले. ही रसिकांसाठी एक पर्वणीच ठरली. या गीतांव्यतिरिक्त श्रीनिवास खळेंच्या संगीत दिग्दर्शनाखाली लता मंगेशकर यांनी गाईलेली काही गाणी —

१) भावनांचा तू भुकेला (१९६८), २) जाहल्या काही चुका (१९७०), ३) चुकचुकली पाल एक (१९७०), ४) नीजमाझ्या नंदलाला (१९७०), ५) साऊलीस का कळे (चित्रपट –सोबती, १९७९)

गानसम्राज्ञी लता मगेशकर, श्री. खळे यांच्या रचनांबद्‌दल बोलताना म्हणतात, “खळेंच्या स्वररचनेत वैचित्र्य आहे, भावपूर्णता आहे, नावीन्य आहे, खोली आहे आणि या साऱ्याला शास्त्रीय ज्ञानाची पक्की बैठक आहे. मुख्य म्हणजे त्यात कुणाचेही अनुकरण जाणवत नाही. जे आहे ते खळयांचेचं स्वतंत्र आणि अस्सल असे कलावैभव आहे”.

**२) आशा भोसले**

१९५६ साली ‘यंदा कर्तव्य आहे’ हा चित्रपट प्रदर्शित झाला. खळे यांनी संगीत दिलेला हा पहिला चित्रपट; या चित्रपटातील सर्व ५ गीतांना आशा भोसलेंचा आवाज लाभला. या चित्रपटाचे गीतकार होते गोविंद पोवळे.

१९६१ मध्ये ‘बोलकी बाहुली’ हा चित्रपट आला. या चित्रपटाच्या संगीताची जबाबदारी चार संगीतकारांकडे सोपवली गेली होती. चित्रपटातील तीन गीतांचे संगीत देण्याचे काम खळे यांच्याकडे होते. पैकी दोन गीते आशा भोसले यांनी गायली.

१९६८ मध्ये गुरुदत्त फिल्म्स् चा ‘जिव्हाळा’ हा चित्रपट पडद्यावर आला. त्यातील ‘चंदाराणी’ हे बालगीत व ‘प्रिया तुज काय दिसे स्वप्नात’ ही दोन चैतन्यमय गीते आशा भोसले यांनी पेश केली.

१९७० साली ‘पोरकी’ हा चित्रपट आला. यातील दोन गीते आशा भोसले यांनी गाईली. या चित्रपटातील सर्वच रचना चांगल्या होवूनही चित्रपट लोकांच्या पसंतीस न उतरल्यामुळे ही गीते रसिकांच्या विस्मरणात गेली.

१९७९ साली ‘सोबती’ हा चित्रपट झळकला. त्यातील सर्वच गीते खूप लोकप्रिय झाली. ‘आली आली सर ही ओली’ व ‘पाण्यातले पहाता’ ही गीते आशा भोसले यांनी गाईली.

१९५२ सालातील ‘लक्ष्मीपूजन’ या चित्रपटाच्या संगीत दिग्दर्शनासाठी खळे यांना नियुक्त केले गेले. परंतु हा सिनेमा प्रदर्शितच झाला नाही. १९५२ मधील या चित्रपटातील ग. दि. माडगुळकर यांची गीते १९५६ साली एच.एम.व्ही साठी श्री. खळे यांनी आशा भोसलेंकडून ध्वनिमुद्रित करुन घेतली. ती गीते म्हणजे ‘गोरी गोरी पान’ व ‘एका तळयात होती’. या दोन गाण्यांनी फार मोठा इतिहास निर्माण केला.

पुढे आशा भोसलेंच्या आवाजात भावगीते, भक्तिगीते इतकेच नाही तर बालगीतेही खळेंनी संगीतबध्द केली त्यापैकी काही गाणी –

१) काल पाहिले मी स्वप्न गडे (१९५८), २) रुसला मजवरती कान्हा (१९५८), ३) आजि मी ब्रह्म पाहिले (१९५९), ४) सहज सख्या एकटाच येई सांजवेळी (१९६०), ५) नको ताई रुसु (१९६१)

श्रीनिवास खळे यांच्या अशा अनेक उत्तम स्वररचनांना आशा भोसलेंचा आवाज लाभला आहे.

आशा भोसलेंबद्‌दल बोलताना श्री. खळे नेहमी म्हणायचे, “मी आशाताईंचे उपकार कधीच विसरणार नाही. कारण माझं नांव नसताना त्यांनी माझ्यासारख्या नवख्या कलाकाराला संधी दिली.”

**३) सुमन कल्याणपूर**

निखळ, नितळ म्हणावा असा सच्चा सुरेल स्वर म्हणजे सुमन कल्याणपूर! परंतु त्या स्वराला न्याय देणारी, त्यांच्या गायकीची परीक्षा घेणारी फारशी गाणी त्यांच्या वाटयाला आली नाहीत. इतकेच नव्हे तर बहुतेक वेळा त्यांच्या आवाजाची तुलना लता मंगेशकरांच्या आवाजाशी होत गेली आणि याच तुलनेच्या आग्रहापायी या गायिकेला काही गाणी वगळता, फारशी संधी मिळाली नाही आणि त्यांच्या गायनाचे तसे चिज झाले नाही. श्री. खळे यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली सुमन कल्याणपूर यांनी मोजकीच गीते गायली. परंतु ती सर्व गीते रसिकांच्या पसंतीस उतरली.

१९६१ साली आलेला 'बोलकी बाहुली' या चित्रपटातील 'देवा दया तुझी' हे सुमन कल्याणपूर यांनी गायलेलं गीत प्रचंड लोकप्रिय झाले.

१९६६ साली अरुण दाते आणि सुमन कल्याणपूर यांनी गायलेलं 'जादू अशी घडे ही' हया द्वंद्वगीतातून आपल्याला संगीतकार खळे यांनी पुरुषांच्या व स्त्रीयांच्या आवाजातील अंगभूत वैशिष्ट्यांचा कशा प्रकारे उपयोग करुन घेतला हे अचूक समजते. पुरुषांचा 'बेस' चा आवाज मंद्र आणि मध्य सप्तकात खुलतो तर स्त्रियांचा मध्य आणि तार सप्तकात. या प्राकृतिक वैशिष्ट्यांचा उपयोग या गीतातून खळे यांनी दर्शविला. विशेष म्हणजे या दोघा गायक कलाकारांनी एकत्र गाईलेलं हे एकमेव गाणे आहे.

सुमन कल्याणपूर यांनी या गीतात 'जादू अशी घडे ही या दोन लोचनांची' ही ओळ अतिशय समर्थपणे गाईलेली आहे.

खळे यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली सुमन कल्याणपूर यांनी गायलेली इतर गीते—
१) या गडे हासू या (१९५९), २) गोफ गुंफूया ग (१९५९), ३) बोलून प्रेम बोल (१९६४) ४) उतरली सांज ही धरेवरी (१९६४), ५) मी चंचल होवून आले (१९६८)

### ४) कुंदा बोकील

श्रीनिवास खळे यांनी १९६० ते १९६८ साली मुंबई आकाशवाणी मध्ये नोकरी केली. आकाशवाणीच्या कारकीर्दीत अनेक, नवनवीन कलावंत खळे यांच्या स्वररचना गाऊन गेले. मात्र खळे यांच्या मनावर, जाणकार रसिक व आघाडीच्या कलावंत मंडळींच्या मनावर ठसा उमटवणारी गायिका म्हणून उल्लेख करावा लागेल तो गायिका कुंदा बोकील यांचा! हे नाव घेतलं की, आठवण होते ते कविवर्य गंगाधर महांबरे यांच्या 'निळा सावळा नाथ' (१९६३) या गाण्याची. या गायिकेने, या गाण्याचे त्याचबरोबर या स्वररचनेचे अगदी सोनं केलं. स्वररचनेतील लयींचा अंदाज व कुंदा बोकील यांनी त्याला गायनातून दिलेला न्याय हे या गीताचे वैशिष्ट्य सर्व रसिकांनी मान्य केले आहे.

कुंदा बोकील या गुणी कलावतीला गाण्याची चांगलीच समज होती. संगीतात 'सूर' शिकवून तयार करता येतो. परंतू 'लय' मात्र उपजतच असावी लागते. कुंदा बोकिल यांच्या गायकीमध्ये लय होती आणि म्हणून त्यांच्या आवाजात खळेंच्या स्वररचना अधिक चांगल्या प्रकारे खुलल्या.

कुंदा बोकील — खळे यांची गीते—
१) गमाडी गंमत जमाडी जंमत (१९५९), २) शाळा सुटली पाटी फुटली (१९५९)
३) वैकुंठीचा राणा (१९६३)

फार कमी कलावंताच्या ठिकाणी गाण्यातील समंजसपणा उपजतच असतो. हा दूर्मिळ गुण कुंदा बोकिल यांना लाभला होता. मात्र लग्न झाल्यावर त्यांचे गीत गायन थांबले. आपल्या क्षेत्रात खूप नांव काढण्याइतकी प्रतिभा असलेल्या या गुणी गायिकेबद्‌दल खळे यांना नेहमीच दु:ख वाटत असे.

### ५) देवकी पंडीत

आपल्या निकोप गायनातून श्रोत्यांना आत्मिक आनंद देणाऱ्या व आपली अभिजात शैली जपणाऱ्या गायिका म्हणून देवकी पंडीत यांना आपण ओळखतो. कोणत्याही चौकटीत स्वत:ला अडकवून न ठेवता शास्त्रीय संगीत, उपशास्त्रीय संगीत, सुगम संगीत, चित्रपट संगीत अशा चहूबाजूंनी आपले गाणे बहरत देवकी पंडीत यांनी बहरत ठेवले आहे.

देवकी पंडीत यांच्या बरोबर श्री. खळे यांनी 'वृंदावन' (८ गीते) नामक कृष्णभक्तीवर गीते असलेला हिंदी अल्बम ध्वनिमुद्रित केला. त्यातील प्रत्येक स्वररचनेला लाभलेली अभिजात शास्त्रीय रागांची बैठक सौ. देवकी पंडीत यांनी समर्थपणे तोलून धरली आहे.गीतातील भाव, शब्दोच्चार व त्यांची अचूक फेक या काहीशा अवघड असलेल्या गोष्टी स्वर रचनाकार खळे यांनी गायिकेकडून ताकदीने गाऊन घेतल्या आहेत.

या अल्बमबरोबरच 'कविता रसावलेली' (८ गीते) ही ध्वनीमुद्रिका देवकी पंडीत व सुरेश वाडकर यांच्या आवाजात खळे यांनी अगदी अलीकडच्या काळात (२००९)

ध्वनीमुद्रित केली. श्रीनिवास खळे यांनी देवकी पंडीत यांचेकडून अनेक अभंग, भावगीते गाऊन घेतली. "गाणं जसंच्या तसं उचलणं महत्वाचं असतं. प्रत्येक गाण्याचा जो भाव असतो तो शब्दोच्चारातून व्यक्त न होता स्वरातून व्यक्त व्हावा लागतो. म्हणजे गायकाच्या गळयातील सुरातूनच तो प्रकट व्हायला हवा." या गोष्टींकडे आपल्या गीतातून देवकी पंडीत यांनी जाणिवपूर्वक लक्ष दिलेले दिसते.

'आज अवेळीच कशी सांज झाली' हे कवी गंगाधर महांबरे याचं आणि 'अशी सांज कां रोज अलवार होते' ही श्रीनिवास खळे यांच्या संगीत रचनेतील दोन गीते देवकी पंडीत –श्रीनिवास खळे यांच्या सहयोगातील यशस्वी प्रस्तुती आहे.

**श्रीनिवास खळे यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली गाईलेले काही प्रमुख गायक –**

**१) पं. भीमसेन जोशी**

रसिकप्रिय, थोर गायक पं.भीमसेन जोशी हे आपल्या प्रभावी गायनाने संपूर्ण जगभरात व आबालवृध्दात अत्यंत लोकप्रिय असणारे एकमेव गायक आहेत. अत्यंत मोकळा आवाज, दीर्घ पल्ल्याच्या ताना घ्यायची असामान्य ताकद, आपल्या परिपूर्ण गायकीतून रसिकांना आश्चर्यचकित करण्याची क्षमता यामुळे त्याचं गायन रसिकप्रीय झाले. संगीत साम्राज्यावर त्यांनी ५०–६० वर्षे अक्षरश: एखादया सम्राटासारखे राज्य केले.

शास्त्रीय संगीताबरोबरच भक्ति संगीतातही भीमसेन जोशींनी आपली खास शैली निर्माण केली. भजन गायकीला मैफिलीत मानाचं स्थान, तसेच अपरिमित प्रसिध्दी मिळवून देण्यात ज्या शास्त्रीय संगीत गायकांचा महत्वाचा वाटा आहे; त्यात पं. भीमसेन जोशी याचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. रुंद, भरदार, मर्दानी, प्रसंगी हळवा या वैशिष्टयांनी परिपूर्ण अशा त्यांच्या आवाजासाठी श्री. खळे यांनी साजेशा रचना केल्या.

१९८० मध्ये श्री. खळे यांनी संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ यांचे निवडक अभंग (६ अभंग) पं. भीमसेन जोशीच्या आवाजात ध्वनीमुद्रीत केले. भीमसेन जोशींचा धारदार आवाज त्यात अभंगांची 'गायकी अगाची चाल', यामुळे हे अभंग ऐकणं हा परमोच्च श्रवणीय आनंद आहे. अभंगातील प्रत्येक स्वर, त्याला जोडून केलेले शब्दांचे उच्चार आणि त्यातून निर्मिलेला भाव हे केवळ अप्रतिम आहे.

पुढे १९८५ मध्ये गानसम्राज्ञी लता मंगेशकर व पं. भिमसेन जोशी या दोन श्रेष्ठ भारतरत्न कलावंतांना एकत्रित आणून श्री. खळे यांनी 'राम शाम गुणगान' (८ भक्तीगीते)हा अल्बम ध्वनिमुद्रीत केला. भरदार कमावलेला, रियाजी, शास्त्रीय संगीतात मुरलेला स्वर व तेवढाच रियाजी, अभ्यासातून परिपक्व झालेला रेशमी स्वर यांना इतिहासात प्रथमच एकत्र आणण्याचे श्रेय श्रीनिवास खळे यांनाच जाते.

श्रीनिवास खळे यांच्या संगीत दिग्दर्शनाबद्दल गौरवोद्गार काढताना पंडीतजी म्हणतात "श्रीनिवास खळे यांचे संगीत साधे, सरळ कधीच नसते. स्वरांची ठेवण, लय सर्वच गोष्टी अनाकलनीय, सामान्य संगीतकारापेक्षा निराळे आहे."

पं.भीमसेन जोशी–श्रीनिवास खळे यांची काही अभंग –

१) विठ्ठल गीती गावा (संत तुकाराम, १९८०)

२) पंढरीचा वास चंद्रभागे स्नान (संत नामदेव, १९८०)

**२) पं.वसंतराव देशपांडे**

पं.वसंतराव देशपांडे यांचे गाणे म्हणजे सतत पुढे जाणारे, प्रवाही गाणे. सहज, न थकता बोलण्याइतके स्वाभाविकपणे ते गायचे. त्यांच्या आवाजाची 'पट्टी' अडीच सप्तके होती. कृत्रिम, खोटे आवाज काढून ते तारसप्तकात गात नसत. बुध्दिप्रधान तरल–चंचल ताना, हरकती किंवा मुरक्या इतरांहून वेगळी अशी त्यांची कल्पक गायकी होती. पक्क्या गाण्याबरोबर ठुमरी, दादरे, टप्पे, नाटयगीते, भावगीते, भजने असे बहुविध गानप्रकार ते अतिशय कौशल्याने गात. त्यांच्या गाण्यातील रंग व लयकारी, ऐकणाऱ्यात संक्रमित होऊन श्रोता बेभान होत असे. पं.वसंतराव देशपांडेंच्या शास्त्रीय संगीतात विद्वता होती,

व्यासंगाची दृष्टी होती, एक ओघवती सहजता होती. त्यामुळे वसंतरावांच्या साऱ्या गाण्यावर त्यांची स्वत:ची विशिष्ट छाप आहे.

एक चतुरस्त्र गायक म्हणून वसंतरावांची ओळख आहे. एकीकडे रागदारी संगीतात सूर, लय, कल्पकता या बरोबर आलापी, बोलअंग, तान, सरगम अशा विविध गानअंगावर त्यांचे असामान्य प्रभुत्व होते. तर दुसरीकडे भावसंगीतातील सर्व प्रकार ते खुबीने गायचे, रंगवायचे हा त्यांच्या गायकीतील प्रभावी जिवंतपणा श्री. खळे यांनी अचूक हेरला. त्यांच्यातील उपजत लयीला साजेशा दोन रचना श्री. खळे यांनी त्यांच्याकडून गाऊन घेतल्या.

१) 'बगळयांची माळ फुले (१९७०), २)'राहीले ओठातल्या ओठात' (१९७०). या दोन्ही रचनांनी स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. ही गीते जनामनात कायमची रुजली, सर्वकाळ लोकप्रिय राहिली.

ख्यालापासून लोकगीत–भावगीत–अभंगांपर्यंतच्या विस्तीर्ण स्वरसृष्टीत पं. वसंतरावांनी श्रोत्यांना मनमुराद संचार करविला. वसंतरावांच्या इतका संगीतावर सर्वांगीण प्रभुत्व असणारा, बुध्दी आणि भावना यांचा अपूर्व मिलाफ साधणारा गायक क्वचितच पहावयास मिळतो.

**३) पं. हृदयनाथ मंगेशकर**

विश्वविख्यात मंगेशकर घराण्याचे सुपुत्र, बुध्दिमान, अभ्यासू, प्रयोगशील, स्वतंत्रविचारांचा, नाविन्याचा ध्यास असलेला संगीतकार–गायक म्हणून पं. हृदयनाथ मंगेशकरांचे नांव भावसंगीताच्या प्रांगणात जाणिवपूर्वक घ्यावे लागेल. 'भावी काळात ते गायक होणार' या गोष्टीवर त्यांच्या बालपणातच शिक्कामोर्तब झाले. 'श्यामची आई', 'दिवाना' या चित्रपटात बालगायक हृदयनाथांनी गाईलेली गाणी त्यांच्यातील गायिकी गुणांची साक्ष देणारी होती. पंडीतजींच्या आवाजातील लहेजा व पोत ओळखून श्रीनिवास खळे यांनी खास त्यांच्यासाठी दोन रचना बनविल्या. १) लाजून हासणे (१९६९), २) गेले ते दिन गेले (१९६९)

स्वत: उत्तम संगीतकार असल्याने, श्रीनिवास खळे यांना गीतात अभिप्रेत असलेले भाव, हरकती हृदयनाथांनी आपल्या गळयात अगदी अप्रतिम चढविल्या आहेत. पं. हृदयनाथ मंगेशकर यांना श्रीनिवास खळे यांच्या बद्दल खुप आदर तितकेच कुतुहलही होते. संगीत क्षेत्रात खळेंनी केलेल्या विविध प्रयोगांकडे हृदयनाथ मोठया जिज्ञासेने पहात आले आहेत. आणि म्हणून त्यांनी खळेबद्दल “अज्ञानाची कुंपणे ओलांडणारा संगीतकार” असे गौरवोद्‌गार काढले आहेत.

या प्रयोगशील, प्रतिभावंत गायक–संगीतकाराने परंपरागत गायिकीच्या सीमा ओलांडणाऱ्या, आचंबीत रचना अनुभवण्याचा योग श्रोत्यांना पुरेपुर दिला. मात्र गायक म्हणून मंगेशकरांची अनवट गायकी रसिकमान्य करण्यात श्रीनिवास खळे हे समर्थ दुवा राहीले.

**४) सुधीर फडके**

आपल्या संगीताने व आवाजाने सर्व महाराष्ट्राला व महाराष्ट्राबाहेरच्या रसिकांना आपलसं करणारे व त्यांच्या मनामध्ये आदराचे स्थान भूषवणारे ज्येष्ठ श्रेष्ठ संगीतकार–गायक म्हणजे सुधीर फडके! सुर, लय, ताल, भाव व शब्दोच्चार हे सुगम संगीतातले पाचही महत्त्वाचे घटक त्यांनी लोकांसमोर आपल्या गाण्यातून मांडले. स्वरात असलेला विलक्षण गोडवा ही त्यांच्या आवाजाची महत्त्वाची बाब आहे. परंतू त्यामागील त्यांची तपश्चर्या सुध्दा खुप महत्त्वाची आहे.

'लळा जिव्हाळा शब्दच खोटे', या 'जिव्हाळा' चित्रपटातील गीतात त्यांनी ओतलेला 'भाव' हा एक विलक्षण अनुभव आहे. सुधीर फडके या शब्द अन् शब्द तोलून मापून गाणाऱ्या कलाकाराचे गाणे, आपल्या लयकारीने युक्त अशा सुदंर चालीत बांधणारे संगीतकार श्रीनिवास खळे यांच्यामुळे या गाण्याची गणना कालातीत रचनेत झाली आहे.

सुधीर फडके जेव्हा दुसऱ्या संगीतकारांच्या रचना गायचे तेव्हा कसलाही मोठेपणा न दाखवता अत्यंत प्रामाणिकपणे, मनापासून संगीतकाराचे समाधान होई पर्यंत ते गीत शिकायचे व गाऊन दाखवायचे.

'लळा जिव्हाळा' या गीता नंतर श्री. खळे यांच्या संगीत रचनेखाली त्यांनी 'माझी अगाध प्रिती' (चित्रपट—पोरकी, १९७०) हे गीत देखील गाईले. त्यावेळेस सुधीर फडके यांनी श्रीनिवास खळे बद्दल काढलेले उद्‌गार असे—

''खळे यांच्या स्वररचना गाणे तसे काहीसे अवघडच! त्याच्या चालीत बारीक सारीक जागा, स्वरांची आंदोलने, हेलकावे, मींड, लटके, आघात, हलकेसे झोले, स्वर हळूच सोडणे, शब्दोच्चार हे सारे प्रकार स्वत: खळे ज्यावेळी स्वररचना समजावून सांगतात, त्यावेळी स्वत:च्या गळयातून व्यवस्थितपणे दाखवतात. खळेंकडून चाल शिकणे हे बुध्दीला उत्तम खाद्य असते.''

अशा सुधीर फडके या बहुआयामी व्यक्तीमत्त्वाचा, त्यांच्या कलागुणांचा रसिकांना कधीच विसर पडणार नाही.

**५) अरुण दाते**

भावगीताच्या गायकीतील भावगर्भता अचुकपणे व्यक्त करणारे गायक म्हणून आपण अरुण दातेंना ओळखतो. भावगीत कसे गावे? त्यातील बारकावे, एकंदरीत त्याचा बाज यावर त्यांची प्रचंड हुकुमत होती. तरल, ह्रदयाला भिडणारे स्वर आणि अशी एक से एक गायलेली त्यांची भावगीते प्रत्येक पिढीतील श्रोत्यांच्या ह्रदयात अलवार झिरपत गेली. अरुण दाते यांनी फार मोठा काळ नव्हे तर कालखंड गाजविला. श्रीनिवास खळे आणि अरुण दाते यांनी मिळून भावगीताच्या पटावर नवे मापदंड निर्माण केले. ज्याचे अनुकरण नंतरचा बराच काळ होत राहीले असे संशोधक म्हणून मला जाणवते.

संगीतकार श्रीनिवास खळे यांच्या संगीत दिग्दर्शनामध्ये अरुण दाते यांनी गाईलेली काही गीते—

१) शुक्रतारा मंदवारा (१९६६), २) हात तुझा हातातून (१९६६), ३) पहिलीच भेट झाली (१९६८), ४) ती रात्र कुसुंबी (१९८६), ५) प्रेम हे तुझे माझे (१९८६)

''खळेंच्या स्वररचनेतील उद्‌भूत कसब, त्याला सर्वार्थाने न्याय देण्याचा प्रयत्न माझ्यामधल्या गायकानं केला. 'मराठी भावगीत गायक हे अर्थपुर्ण बिरुद माझ्या नावाशी कायमंच जोडलं गेलं ते केवळ खळे साहेबांमुळेच! केवढं मोठं ऋण आहे त्यांच माझ्यावर" अशी कृतज्ञता अरुण दाते यांनी खळेंबद्‌दल व्यक्त केलेली आहे.

**निष्कर्ष**

संगीतात आकंठ बुडालेल्या श्रीनिवास खळे यांच्याकडे नवनिर्मितीची प्रचंड ऊर्जा होती. आणि ती त्यांनी उत्तम पध्दतीने, सावकाशीने पणाला लावली. त्यांची गीते ही हया विधानाची साक्ष आहेत. परंतु गीतांना अभिजातता प्राप्त करुन देण्यासाठी केवळ सर्जनशक्ती असून भागत नाही तर प्रतिभेच्या परीसस्पर्शाची आवश्यकता असते. श्री. खळे यांच्या प्रतीभेला अशा परीसाचा स्पर्श निश्चितच झाला होता असे संशोधक म्हणून मला अभ्यासांती आढळते.

गानसम्राज्ञी लता मंगेशकर पासून अगदी कुमुद भागवतांपर्यंत आणि पंडित भीमसेन जोशीं पासून अगदी प्रल्हाद शिंदे यांच्या पर्यंत सुमारे ९२ गायक— गायिकांनी श्रीनिवास खळे यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली गाईले आहे. प्रत्येक गायकाची गाण्याची, शब्दोच्चाराची शैली वेगळीच असते; आवाजधर्म वेगळा असतो, हयाचा सुक्ष्म अभ्यास करुन त्या कलाकाराकडून जास्तीत जास्त परिणामकारकपणे गीत गाऊन घेणे हे संगीत रचनाकार आणि दिग्दर्शक म्हणून श्रीनिवास खळे यांची खासीयतहोती.

भावगीताच्या आणि ललित संगीताच्या प्रांतात श्रीनिवास खळे यांनी उमटवलेली मुद्रा इतकी ठसठशीत आहे की त्यांचे कोणतेही गीत ऐकताना त्याचा अनुपमेय प्रत्यय येतो.गेल्या अनेक वर्षापासूनचे श्रीनिवास खळे यांचे हे शाश्वत संगीत रसिकांच्या मनात चिरंतन राहील व अत्युच्च समाधान देणारे राहील.

**संदर्भ सूची**

१) मारुलकर दत्ता, (२००९), 'अंतर्यामी सुर गवसला', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई.
२) शेरे. भा.ग., (१९७०) 'श्रीनिवास खळे — एक संकलन', मौज प्रिटींग ब्युरो, मुंबई.
३) डॉ. अभ्यंकर शोभा, (२०१२), 'सखी भावगीत माझे', राजहंस प्रकाशन, पुणे.
४) देव यशवंत, (२००४), 'कधी बहर कधी शिशिर', अनघा प्रकाशन, ठाणे (पुर्व).
५) रानडे प्रमोद, (२०१६), 'गोष्टी गाण्यांच्या', सुरेश एजन्सी, पुणे.
६) वाळुंजकर वसंत, (२०१३), 'स्वरश्री बाबूजी', दिलीपराज प्रकाशन, पुणे.
७) डॉ.कर्वे स्वाती, (२०१५), 'कलाकार भेटलेले—न भेटलेले', नन्दिनी पब्लिशिंग हाऊस, पुणे.
८) डॉ. केसकर अनघा, (२०१३), 'नामांकित', विजय प्रकाशन, नागपूर.
९) मंगेशकर लता, (१९९७), 'फुले वेचिता', मैत्रेय प्रकाशन, विलेपार्ले (पुर्व) मुंबई.
१०) जठार प्रभाकर, (१९९५), 'स्वरसौहर्द', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
११)मारुलकर दत्ता